मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते ऑलिम्पिक खेळाडूंचा सन्मान >>पान 2

मालेगांव येथे नवदुर्गा उत्सव निरोप मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न >>पान 3

भू वैज्ञानिक सर्वेक्षण मंत्रालयाच्या टीमने घेतला स्वच्छता अभियानात भाग >>पान 4


**सुविचार**

हाव सोडली की मोह संपतो
आणि मोह संपला की दुःख संपते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 69 ■ मंगळवार, दि. 15 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





अक्षय कुमारने महिला रिक्षाचालकाला दिले १० हजार रुपये आणि म्हणाला- तुम्ही कधीही येऊ शकता मला भेटायला आतील पान


# अभिनेते अतुल परचुरेंचं निधन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मराठी रंगभूमीवर अधिराज्य गाजवणारे आणि असंख्य प्रेक्षकांची मने जिंकणारे हरहुन्नरी अभिनेते अतुल परचुरेंचं निधन झालं. त्यांनी कर्करोगाशी यशस्वी झुंज दिली होती. मात्र, सोमवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्र्वास घेतला. मराठी रंगभूमीवर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हरहुन्नरी कलाकार, अशी त्यांची ओळख होती. निधनासमयी ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्या जाण्याने मराठी सिनेविश्वावर शोककळा पसरली आहे.

अतुल परचुरे यांनी काही काळापूर्वी कर्करोगावर मात मिळवून पुन्हा नव्याने आयुष्य जगण्यास सुरुवात केली होती. सुर्याची पिल्ले या नाटकासाठी ते पुन्हा एकदा रंगभूमीवर दिसणार होते. मात्र काळाने घाला घातला आणि अतुल परचुरेंची प्राणज्योत मालवली.

अतुल परचुरे यांनी आजवर नाटक, मालिका, चित्रपटांत भूमिका साकारल्या होत्या. त्यांनी कापूसकोंड्याची गोष्ट, गेला माधव कुणीकडे, नातीगोती, तुझ आहे तुजपाशी, टिळक आणि आगरकर अशा अनेक नाटकांमध्ये कामं केली होती. याशिवाय, अळी मिळी गुप चिळी, होणार सून मी या घरची, जागो मोहन प्यारे या मालिकांमध्येही उल्लेखनीय भूमिका केल्या होत्या. तसेच, घरकुल, चाळीशीतले चोर, गोलमाल, पार्टनर, कलयुग, नारबाची वाडी, खट्टा मिठा, बिल्लू बार्बर, आवारापन, क्यु की अशा अनेक मराठी हिंदी चित्रपटातही कामं केली होती. त्याच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या जाण्याने राज्यभरातून प्रतिक्रिया येत आहेत.

रसिक प्रेक्षकांना कधी खळखळून हसवणारे, कधी डोळ्यात आसू उभे करणारे. कधी अंतर्मुख करणारे अभिजात अभिनेते अतुल परचुरे यांचे अकाली निधन वेदनादायी आहे. अतुल परचुरे यांनी बालरंगभूमीपासूनच आपली देदिप्यमान अभिनय कारकीर्द गाजवली. नाटक, चित्रपट, मालिका या तिन्ही क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला. तरुण तुर्क म्हातारे अर्क, नातीगोतीसारखी नाटकं असोत किंवा पु. ल. देशपांडे यांचा शाब्दिक, वाचिक विनोद असो, अतुल परचुरे यांनी आपल्या अंगभूत गुणांनी त्यात गहिरे रंग भरले.मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी उत्तम व्यक्तिरेखा साकारल्या. त्यांच्या जाण्यामुळे मराठीतला एक अभिजात अभिनेता हरपला आहे. हे नुकसान भरुन येण्यासारखे नाही. परचुरे यांच्या हजारो चाहत्यांपैकी एक या नात्याने कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. हे दुःख सहन करण्याचं बळ ईश्र्वर त्यांना देवो. राज्य सरकारच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली वाहतो.



ओम शांती.

**एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

मराठी आणि हिंदी अशा दोन्ही सिनेसृष्टी गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते अतुल परचुरे यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक आहे. आपल्या विनोदी भूमिकांमार्फत त्यांनी प्रेक्षकांच्या मनामध्ये आपली जागा निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने सिनेमाजगत आणि नाट्यसृष्टीचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना व चाहत्यांना लाभो, हीच ईश्र्वरचरणी प्रार्थना!

**देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

अतुल परचुरे याला नववीत असल्यापासून रंगभूमीवर काम करताना मी पाहिलं आहे. त्याच्या निधनामुळे रंगभूमीचं फार नुकसान झालं आहे. कर्करोगावर मात मिळवून पुन्हा तो अभिनयाकडे वळला होता. चाळीशीतले चोर हा चित्रपट केला आणि त्यानंतर आता सुर्याची पिल्ले हे नाटक देखील करणार होता. पण त्याचं जाणं ही अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे.

**जयवंत वाडकर, ज्येष्ठ अभिनेते**

कर्करोगासारख्या मोठ्या आजारातून ते बरे झाले होते. लवकरच आपण एकत्र नाटक करु असं म्हणाले होते पण अचानक त्यांच्या निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झालं आहे. एक उत्तम सहकलाकार, खवय्या आणि माणूस होते ते. जागो मोहन प्यारे म्हटलं की डोळ्यांसमोर त्यांचाच चेहरा येत आहे. खूप मोठं नुकसान झालं आहे आम्हा कलाकारांचं.

**सुप्रिया पाठारे, अभिनेत्री**

गेल्या काही दिवसांपासून आजारी होता अतुल दादा पण अचानक आपल्यातून निघून जाईल असं वाटलं नव्हतं. अजूनही तो आपल्यातून कायमचा निघून गेला आहे हे कटू सत्य पचत नाही आहे. पण एक हरहुन्नरी कलाकार निघून गेला याचं अत्यंत दुःख आहे.

**मधुरा वेलणकर**

## येत्या २४ तासात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सध्या राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुका कधी जाहीर होणार तसेच आचारसंहिता कधीपासून लागणार याबाबतची चर्चा सुरु असताना राजकीय रिंगणातून मोठी बातमी समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज राज्य मंत्रीमंडळाची महत्त्वाची बैठक घेण्यात आली आहे. यामध्ये राज्य सरकारबाबात महत्त्वाचे निर्णय मांडण्यात येणार असून येत्या २४ तासांत कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.

१० नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर यादरम्यान राज्यात मतदान तर, २० ते २५ नोव्हेंबर दरम्यान मतमोजणी होऊ शकते. २६ नोव्हेंबरला राज्यातील विधानसभेचा कार्यकाळ संपत आहे, त्याआधी नवे सरकार सत्तेत येईल, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केले होते. त्यानुसार आज किंवा उद्या निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडणार असून कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागली जाऊ शकते, असे वक्तव्य राज्यातील काही नेत्यांनी केले आहे.

## नवी मुंबईत अग्नितांडव! एनआरआय संकुलातील सदनिकेत भीषण आग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : नवी मुंबईतील एनआर कॉम्प्लेक्समधील इमारतीच्या १७ व्या मजल्यावर अचानक आग लागली. काही क्षणातच या भीषण आगीने रौद्र रुप धारण केल्यामुळे संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले होते. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील सर्वात उच्चभ्रू वसाहत समजल्या जाणाऱ्या नेरुळ येथील एनआरआय कॉम्प्लेक्स मधील ४७ व्या इमारतीच्या १७ व्या मल्यावरील सदनिकेला आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे ३ बंब घटनास्थळी दाखल झाले. सकाळी नऊच्या सुमारास आग आटोक्यात असून आसपासच्या सदनिका रिकाम्या करण्यात आल्या आहेत.

सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरीही भीषण आगीत घर जळून गेले आहेत. तसेच ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्यापही समोर आलेले नाही.

## भाजपआधीच शिंदेंनी सिक्सर मारला, विधानसभेचा पहिला उमेदवार घोषित केला

दैनिक आपला विदर्भ

**रामटेक/प्रतिनिधी** : एका बाजूला महायुतीमध्ये जागा वाटपाचा निर्णय अद्याप जाहीर झाला नसताना दुसरीकडे उमेदवार जाहीर करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आपल्या पक्षाकडून उमेदवारांची घोषणा केली. त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील आपला पहिला उमेदवार जाहीर केला आहे. विशेष म्हणजे या जागेवर भाजपकडून दावा सांगण्यात आला आहे.



रामटेकचे अपक्ष आमदार आशिष जयस्वाल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. जयस्वाल यांच्या पक्ष प्रवेशावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट उमेदवारी जाहीर केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या या घोषणेने भाजपच्या इच्छुकांना धक्का बसला असल्याचे म्हटले जात आहे.

महायुतीत रामटेक विधानसभेची जागा कोण लढेल यावरून खल सुरू आहे. तर, दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अपक्ष उमेदवार आशिष जयस्वाल यांना उमेदवारी जाहीर केली. आशिष जयस्वाल हे २०१९ मध्ये अपक्ष उमेदवार म्हणून विजयी झाले होते. शिवसेनेत फूट पडल्यानंतर काही अपक्ष आमदारांनी एकनाथ शिंदे यांना साथ दिली होती. त्यात आशिष जयस्वाल यांचाही समावेश आहे. आशिष जयस्वाल यांनी गुवाहाटी गाठत शिंदे यांना साथ दिली होती.

आशिष जयस्वाल यांना महायुतीची उमेदवारी देण्यात येऊ नये अशी स्थानिक भाजप नेत्यांची मागणी आहे. भाजपने या मतदारसंघातून आपला उमदवार उतरवण्याची मागणीदेखील स्थानिक नेतृत्त्वाने केली. मात्र विरोध असतानाही जयस्वाल यांना शिंदेंच्या शिवसेनेने उमेदवारी जाहीर केल्याने भाजपमधील इच्छुकांना धक्का बसला आहे.

महायुतीमधील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातील जागा वाटप आता अंतिम टप्प्यात असल्याची माहिती आहे. महायुतीमध्ये भाजप १५० ते १६० जागा लढवणार असल्याची माहिती आहे. तर, उर्वरित जागा या शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळणार असल्याची चर्चा आहे. महायुतीमधील इतर घटक पक्षांना कोणत्या जागा मिळणार हे अद्याप स्पष्ट नाही.


## मुंबईत ९ वर्षात १९ गोळीबाराच्या घटना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर राजकीय वातावरण तापले असताना या वर्षभरात मुंबईत राजकीय हत्या अथवा गोळीबाराच्या चार घटना घडल्या आहेत. त्यात अभिनेता सलमान खानच्या घरावरील हल्ला, घोडपदेव येथील राष्ट्रवादीच्या तालुका अध्यक्षाची हत्या, यांचाही समावेश आहे. मुंबईत गेल्या ९ वर्षात १९ गोळीबाराच्या घटनांमध्ये १९ जणांचा मृत्यू झाला आहे.

नुकतीच ५ ऑक्टोबरला घोडपदेव परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) भायखळा विधानसभा तालुका अध्यक्ष सचिन कुर्मी ऊर्फ मुन्ना (४५) यांची हत्या करण्यात आली होती. त्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली होती. हे प्रकरण आता गुन्हे शाखेला वर्ग करण्यात आले आहे. आरोपी सराईत असून यापूर्वीही त्यांच्याविरोधात हत्येचा प्रयत्न, धमकावणे, खंडणी अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

यावर्षी सर्वात चर्चेचा विषय ठरलेली घटना म्हणजे सलमान खानच्या घरावर गोळीबाराची. १४ एप्रिल रोजी अभिनेता सलमान खान याच्या घराबाहेर गोळीबार झाला होता. त्याप्रकरणी कुख्यात लॉरेन्स बिष्णोईसह त्याचा भाऊ अनमोल बिष्णोईसह इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी गोळीबार करणारे विकी साहब गुप्ता आणि सागर श्रीजोगेंद्र पाल यांना गुजरातमधून अटक केली होती. त्यांना पिस्तुल पुरवल्याप्रकरणी सोनू सुभाषचंदर बिष्णोई (३७) व अनुज थापन (३२) यांना पंजाब येथून अटक करण्यात आली होती. याप्रकरणातील आरोपी अनुज थापन याने नुकतीच पोलीस कोठडीत आत्महत्या केली होती. त्याशिवाय टोळीचा म्होरक्या लॉरेन्स बिष्णोई व त्याचा भाऊ अनमोल बिष्णोई यांनाही गुन्ह्यात आरोपी करण्यात आले होते. या प्रकरणात मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मुख्य आरोपी अनमोल बिष्णोई विरोधात लुक आऊट सर्क्युलर जारी करण्यात आले होते.



याशिवाय ७ एप्रिलला आर्थिक वादामुळे झालेल्या गोळीबाराच्या घटनेत विजय शेट्टीयार नावाच्या आरोपीने अॅन्टॉप हिल परिसरात आकाश कदमवर गोळीबार केला. शेट्टीयारला नंतर डोंबिवलीतून अटक करण्यात आली. तसेच २ फेब्रुवारीला बोरीवली परिसरात माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. अभिषेक घोसाळकर व मॉरिस यांच्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून वाद सुरू होती. पण नुकतीच दोघांनीही एकमेकांविरोधातले वाद मिटवून सलोखा केला होता. त्यामुळे मॉरिसने अभिषेक घोसाळकरला साडी वितरण कार्यक्रमाला त्याच्या कार्यालयात बोलावले होते. त्यावेळी केबिनमध्ये गेल्यानंतर फेसबुक लाईव्ह करून मॉरिसने गोळ्या झाडल्या. मॉरिसने त्याच्याकडील रिव्हॉल्वरने गोळ्या झाडल्या. त्यानंतर मॉरिसने स्वतःवरही गोळी झाडली होती.





# उबाठा शिवसेनेत इच्छुकांची भाऊ गर्दी

## सिद्धार्थ खरात यांचे पारडे जड : राजकीय घडामोडींना वेग

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर** : लोणार मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने तो शिवसेनेच्या ताब्यात राहावा, यासाठी निष्ठावंत शिवसैनिकांनी कंबर कसली असून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना तसा विश्वासही दिला आहे.असे असतानाही आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुकांची भाऊगर्दी होत असली तरी उद्धव ठाकरे यांच्याशी घनिष्ठ संबंध असलेले व मंत्रालयीन सहसचिव पदावर काम केलेले सिद्धार्थ खरात यांचे पारडे सध्या तरी जड असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विरोधकही विरोधकांनाही त्यांची धास्ती घेतली असल्याची चर्चा मतदारसंघात आहे.

मेहकर विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा कायम बालेकिल्ला राहिला आहे. त्यामुळे या मतदारसंघातून शिवसेनेच्या उमेदवाराला कायम प्रचंड मताधिक्य मिळत आले आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

शिवसेनेचा असलेला मतदार वर्ग हा मात्र गत दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत पडलेल्या उभ्या फुटीनंतर मतदार विभागला गेला आहे,असे असले तरी शिवसेनेचे निष्ठावंत शिवसैनिक तथा मतदार आजही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत कायम आहेत.याच मतदार राजाच्या बळावर शिवसेनेचे पारडे हे मेहकर मतदारसंघातच नव्हे, तर संपूर्ण राज्यभरात भारी भरत आहे. त्यामुळे विरोधकांनी आतापासूनच चांगलीच जास्ती घेतली आहे.मेहकर विधानसभा मतदारसंघात अनेक जण इच्छुक असले तरी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी अत्यंत घनिष्ठ संबंध असलेले व आदित्य ठाकरे यांच्यासोबत मैत्रीचे संबंध असलेले सिद्धार्थ खरात यांचे पारडे हे सध्या चांगलेच जड भरत आहे.तर मतदार वर्ग ही सिद्धार्थ खरात यांच्या सोबत खंबीरपणे उभा असल्याचे दिसून येत आहे. निष्ठावंत शिवसैनिक तथा मतदार यांच्या बळावर मात्र विधानसभेची निवडणूक सहजरित्या सर केल्या जाऊ शकते असेही मतदारसंघात सर्वसामान्य मतदार तथा शिवसैनिकांकडून बोलले जात आहे.



### तब्बल डजनावर उमेदवार

मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक लढविण्यास एक नवे दोन नव्हे, तर तब्बल अर्थात बाराच्यावर उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. यामध्ये मात्र मंत्रालयीन कामकाजा अनुभव सामाजिक कार्याची गोडी असणारे सिद्धार्थ खरात याची बाजू मजबूत असल्याचे बोलले जात आहे. सिद्धार्थ खरात यांना उमेदवारी मिळाल्यास ते विरोधकांवर मात करतील अशी चर्चाही मतदारसंघात सुरू असून सिद्धार्थ खरात यांच्या नावालाही मतदारांची पसंती मिळत आहे.



## आचारसंहिता अवघ्या काही तासावर

*विधानसभा निवडणुकी संदर्भात आचारसंहिता कधीही लागू होऊ शकते सन २०१९ मध्ये २१ ऑक्टोबरला मतदान होऊन २४ ऑक्टोबरला निकाल जाहीर झाले होते तर २६ नोव्हेंबरला सरकार स्थापन झाले होते. महाराष्ट्र विधानसभेचा विधानसभा सदस्याचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपणार असल्याने त्यापूर्वी निवडणुका होणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे केव्हाही आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यानंतर नोव्हेंबर मध्ये सरकार स्थापन करण्यात आले होते. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी विधानसभा निवडणुका संदर्भात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे.*


## वाचन प्रेरणा दिन...

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत. आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे. वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा – कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते ऑलिम्पिक खेळाडूंचा सन्मान

## स्वप्निल कुसळे यास २ कोटी रुपये तर सचिन खिलारी यास ३ कोटी रुपयांचा धनादेश सुपूर्द







दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पॅरिस, फ्रान्स येथे २०२४ मध्ये झालेल्या ऑलिंम्पिक स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडूंना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते धनादेश आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, क्रीडा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते.

पॅरिस, फ्रान्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील ५० मीटर रायफल ३ पोझीशन या उपप्रकारामध्ये कास्य पदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे व पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील मैदानी स्पर्धेमधील गोळाफेक या उपप्रकारामध्ये रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी या खेळाडूंचा व श्री.कुसळे यांच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे व श्री. खिलारी यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले.

राज्य शासनाने नुकत्याच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडू व प्रशिक्षकांच्या पारितोषिकाच्या रकमेमध्ये केलेल्या भरघोस वाढीच्या पार्श्र्वभूमीवर पॅरिस, ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील कास्य पदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे यास दोन कोटी रुपये तसेच त्यांच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे यांना २० लाख रुपये व पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील मैदानी स्पर्धेमधील रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी यास तीन कोटी रुपये तसेच त्यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना ३० लाख रुपयांचा धनादेश व सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले.

बुडापेस्ट, हंगेरी येथे दि. १० ते २३ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत झालेल्या ४५ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत पुरुष व महिला गटात अनुक्रमे १९३ व १८१ देशांचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत भारताच्या संघाने सुवर्णपदक संपादन करुन ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या संघात राज्याचे बुद्धीबळपटू विदीत गुजराथी व दिव्या देशमुख यांचा समावेश होता, या दोन्ही खेळाडूंचा राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी रोख एक कोटी रुपये व त्यांचे मार्गदर्शक अनुक्रमे संकल्प गुप्ता व अभिजीत कुंटे यांना प्रत्येकी १० लाख रुपये इतकी रक्कम व सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले.

विदीत गुजराथी स्पर्धेकरिता विदेशात असल्यामुळे त्यांच्यावतीने त्यांचे वडील डॉ. संतोष गुजराथी यांनी तर अभिजीत कुंटे यांच्या वतीने त्यांच्या पत्नी मेघना कुंटे आणि संकल्प गुप्ता यांच्यावतीने त्यांचे वडील संदीप गुप्ता यांनी सन्मान स्वीकारला.

# अक्षय कुमारने महिला रिक्षाचालकाला दिले १० हजार रुपये आणि म्हणाला– तुम्ही कधीही येऊ शकता मला भेटायला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सेलिब्रिटी अनेकदा त्यांच्या चाहत्यांना आश्र्चर्यचकित करतात. अक्षय कुमारनेही एकदा असेच काही केले होते. मुंबईतील छाया मोहिते या ऑटो रिक्षाचालकासोबत त्याने असे केले होते. अक्षयने तिला १० हजार रुपयेही दिले होते. स्वतः छायाने एका मुलाखतीत या घटनेबद्दल सांगितले आहे. अक्षयच्या टीमने तिला तिच्या मुलाखतीसाठी बरेच दिवस कसे राजी केले आणि नंतर तिने आश्र्चर्यचकित केले.

छाया मोहिते या मुंबईत ऑटो रिक्षा चालवणाऱ्या पहिल्या महिलांपैकी एक होत्या. २०१८ च्या सुमारास त्यांनी हे काम सुरू केले, तेव्हा अनेक लोक त्यांची मुलाखत घेण्यासाठी येत असत. अक्षय कुमार त्यापैकीच एक होता. छाया यांनी सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, जेव्हा तिने रिक्षा चालवण्यास सुरुवात केली, तेव्हा अनेक माध्यमे त्यांची मुलाखत घेण्यासाठी येत असत. त्यांच्या घराचे व्हिडिओही बनवायचे. मात्र काही काळानंतर ती या सर्व गोष्टी टाळू लागली.

अनेकांनी तिला आता मुलाखतीसाठी पैसे घ्यावेत असा सल्ला दिला, पण छायाने नकार दिला. अक्षयच्या टीमलाही तिच्याशी बोलायचे होते. त्यांना फक्त छायाचे नाव माहीत असल्याने आणि फोटो त्यांच्याकडे असल्याने त्यांना कुठूनतरी छायाचा नंबर मिळाला. तिला अक्षयच्या टीमकडून फोन आला, पण ते अक्षयशी जोडले गेल्याचे सांगण्यात आले नाही. छायाने नकार दिला. पण नंतर खूप प्रयत्नांनंतर छाया राजी झाली. छायाला सन–एन–सँड हॉटेलमध्ये जाण्यास सांगितले. तिथे तिला मोठे सरप्राईज मिळाले. अक्षय कुमार तिच्या रिक्षात होता. तिने अक्षयला जुहूच्या आसपास नेले.

छाया म्हणते, अक्षयने तिला विचारले की ती एका दिवसात किती कमावते. मी त्याला जुहूला माझ्या रिक्षात घेऊन गेले. त्यांना त्यांच्या घरी सोडले. त्याची आई आणि पत्नी खरेदीसाठी जात होते. मी अक्षयसोबत काही फोटो काढले.

'पॅडमॅन'च्या प्रमोशनदरम्यानची ही गोष्ट आहे. अक्षयने छायाला सांगितले की ती तिच्या कुटुंबासह आणि मुलांसह कधीही त्याला भेटायला येऊ शकते. मात्र, या भेटीनंतर छाया कधीही अक्षयला भेटली नाही. या भेटीत अक्षयने छाया मोहिते यांना १० हजार रुपयांची मदतही केली.

## 'उडता गुजरात' ; अंकलेश्वरमधून तब्बल ५ हजार कोटीचं कोकेन जप्त

अहमदाबाद : दिल्ली आणि गुजरात पोलिसांनी टाकलेल्या संयुक्त छाप्यात तब्बल ५१८ किलो कोकेन जप्त केल्यानं मोठी खळबळ उडाली. गुजरातमधील अंकलेश्वर इथल्या एका फार्मा कंपनीत टाकलेल्या छाप्यात हे कोकेन जप्त करण्यात आलं. या कोकेनची आंतरराष्ट्रीय बाजारात तब्बल ५००० कोटी रुपये किंमत आहे. दिल्ली ड्रग्ज छापेमारी प्रकरणात आतापर्यंत थायलंडमधून १,२८९ किलो कोकेन आणि ४० किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी मीडियाला दिली आहे.

गुजरातमधून ५ हजार कोटी रुपयाचं कोकेन जप्त : दिल्ली पोलीस आणि गुजरात पोलिसांनी संयुक्त छापेमारी करुन गुजरातमधून मोठ्या प्रमाणात ड्रग्जसाठा जप्त केला. दिल्ली पोलीस आणि गुजरात पोलिसांनी संयुक्त कारवाई करत अंकलेश्वरमधील एका फार्मा कंपनीत छापेमारी केली. यावेळी पोलिसांनी कंपनीच्या घेतलेल्या झडतीदरम्यान ५१८ किलो कोकेन जप्त केलं. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या कोकेनची किंमत तब्बल ५,००० कोटी रुपये आहे. आतापर्यंत थायलंडमधून १,२८९ किलो कोकेन आणि ४० किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला आहे. या जप्त केलेल्या ड्रग्जची किंमत १३,००० कोटी रुपये आहे, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी दिली आहे.

# केंद्राच्या जुन्या निर्णयामुळे लॉरेन्स बिश्नोईचा ताबा मिळण्यास अडचण, आता मुंबई पोलिसांचा मोठा निर्णय!

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणी लॉरेन्स बिश्नोईची चौकशी होण्याची शक्यता आहे. या हत्येमागे बिश्नोई गँगचा हात असल्याचे समोर आला आहे. त्यामुळे बिश्नोई गँगचा म्होरक्या लॉरेन्स बिश्नोईची चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांचं विशेष पथक साबरमती कारागृहात जाऊन चौकशी करणार असल्याची माहिती मिळत आहे.

पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला हत्याकांडातील मास्टरमाइंड गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई यांची गँग आता महाराष्ट्रात सक्रिय झाली आहे. त्याच्या गँगने सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांची शनिवारी हत्या घडवून आणली. सलमान खानचे जवळचे संबंध असणाऱ्या माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारीही बिश्नोई गँगने स्वीकारली आहे.त्यासंदर्भातच चौकशी करण्यासाठी लॉरेन्स बिश्नोईची चौकशी होण्याची शक्यता आहे. मुंबई पोलिसांचं विशेष पथक साबरमती कारागृहात जाऊन चौकशी करणार आहे.

गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई हा सध्या गुजरामधील साबरमती कारागृहात आहेत. लॉरेन्स बिश्नोई सध्या साबरमती कारागृहातील सर्वात सुरक्षीत अंडा सेलमध्ये कैद आहे. बिष्णोई यांच्या सेलभोवती सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते. वारंवार प्रयत्न करूनही मुंबई पोलीसांना लॉरेन्स बिश्नोईची पोलीस कोठडी मिळाली नाही. कारण सलमानच्या घराबाहेर गोळीबार करण्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी आहे.लॉरेनची पोलीस कोठडी मिळण्यात अडचणी

लॉरेनची पोलीस कोठडी मिळाली यासाठी मुंबई क्राइम ब्रँचकडून सातत्याने प्रयत्न करण्यात आले मात्र त्यांना ती मिळाली नाही. केंद्रीय गृहविभागाने काढलेल्या एका आदेशामुळे मुंबई पोलिसांना लॉरेनची कोठडी मिळण्यात अडचणी येत आहेत येत आहेत . केंद्रीय गृहविभागाच्या या आदेशानुसार लॉरेन्सला एका तुरुंगात दुसरीकडे हलवण्यात प्रतिबंध आहेत . बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात बिश्नोई गैंगचा सहभाग प्राथमिक पातळीवर स्पष्ट होत असल्याने मुंबई पोलीस काही दिवसानंतर लॉरेन्सच्या कोठडीसाठी पुन्हा प्रयत्न करणार आहे. लॉरेन्सच यामागे मुख्य सूत्रधार आहे हे स्पष्ट झाल्यानंतर मुंबई पोलीस करणार प्रयत्न करणार आहेत.

बाबा सिद्दिकींची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. त्यानंतर लॉरेन्स बिश्नोई गँगनं सिद्दिकींची हत्या केल्याचं समोर आलं. यासंदर्भात सोशल मीडियावर एक पोस्टही करण्यात आली. ही पोस्ट व्हायरल झाली आहे. शुब्बू लोणकर नावाच्या व्यक्तीच्या अकाऊंटवरून ही पोस्ट करण्यात आली. या पोस्टमध्ये लॉरेन्स बिश्नोई टोळीनं बाबा सिद्दीकींच्या हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे. या पोस्टमध्ये सलमान खान आणि दाऊद गँगचाही उल्लेख करण्यात आला आहे. पोलिसांकडून या पोस्टसंदर्भात अधिक तपास सुरू आहे.

# "तर विधानसभा निवडणुकीनंतर नोकरी, शिक्षणातील आरक्षण संपेल," ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ


**अकोला/प्रतिनिधी :** राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत आरक्षण कळीचा मुद्दा ठरणार आहे. निवडणुकीनंतर नोकरी व शिक्षणातील आरक्षण संपवण्याचा घाट घातला जात आहे, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केला. आरक्षणामुळे सरकारी नोकर झालेल्या व आता शहाणपण शिकवणाऱ्या बिनडोक लोकांपासून सावध रहा, असे आवाहनही त्यांनी केले.

अकोल्यातील क्रिकेट क्लब मैदानावर आयोजित धम्म मेळाव्यात ते बोलत होते. पी. जी. वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित मेळाव्याच्या व्यासपीठावर बौद्ध महासभा, वंचित आघाडीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी विरोधकांवर चौफेर टीकास्त्र सोडले.

ॲड. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, आपल्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. बऱ्याच जणांना शिंग फुटायला लागली आहेत. पाकीटमारीतून ती आली. लोकसभेमध्ये संविधान वाचवायच्या नावावर गावोगावी फिरत होते. संविधान नव्हे तर काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेनेचे नेते आपले पक्ष वाचवण्यासाठी फिरले. लोकसभा निवडणुकीनंतर संविधानावर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून हल्ला झाला. भाजपचे आरक्षण विरोधी धोरण आहेच. आरक्षणाच्या व्याप्तीकडे आपण बघत नाही.

मविआला मतदान करण्याचे काही आंबेडकरी विचारवंत, अधिकारी सांगत होते. मात्र, ते अधिकारी विद्वान नाही. मविआला पाठिंबा देणे म्हणजे पुढच्या पिढीचे पाय आपणच कापून टाकण्यासारखे आहे. जो समूह आपल्या कुटुंबाशी इमानदार राहू शकत नाही, तो चळवळीशी काय राहणार? अशा शब्दात जातीतील विरोधकांना ॲड. आंबेडकरांनी खडे बोल सुनावले.

आरक्षण हा केवळ नोकरी, शिष्यवृत्तीचा प्रश्न नाही, तर गाभा आहे. शरीरातून हृदय काढले तर जगू शकणार आहे का? त्याच प्रमाणे व्यवस्थेत आरक्षण आहे. आरक्षण हे फक्त एससी, एसटीचे नव्हे तर ओबीसीचे देखील काढले जाण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आरक्षणाविना घटना कुचकामी ठरेल. विधानसभा निवडणुकीत आरक्षण कळीचा मुद्दा आहे. संपूर्ण निवडणूक आरक्षणाच्या भोवती फिरणार आहे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होतील. त्यामध्ये ओबीसी आरक्षण नाही. सर्वोच्च न्यायालयाने ते काढले. विधानसभेनंतर शिक्षण व नोकरीतील आरक्षण सुद्धा काढले जाईल, असे ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले.



ओबीसींचे आवाज दाबण्याच प्रयत्न


शरद पवार आम्ही २०० जागा निवडून आणू असे सांगतात. पण लोकसभेत एकही ओबीसी खासदार निवडून आला नाही. विधानसभेतील ओबीसींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होणार आहे. त्यामुळे ओबीसींनी सावध राहिले पाहिजे. विधानसभेत किमान १०० ओबीसी आमदार राहिले पाहिजे. तरच विरोध करता येईल. आरक्षणाला धोका आहे. विधानसभा निवडणुकीनंतर जनगणनेचा ठराव घेतला जाईल. त्याचा अहवाल येईपर्यंत नोकरी, शिक्षणातील आरक्षण थांबवले जाईल, असे ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. धम्म मेळाव्याला मोठा जनसमुदान उपस्थित होता.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का हिकमत उडान यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थिती शिंदे गटात प्रवेश



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** घनसावंगी मतदारसंघांमध्ये महायुती व महाविकास आघाडी असे सरळ लढत होते महाविकास आघाडी कडून राजेश टोपे मागील पंचवीस वर्षापासून मतदार संघाचे आमदार व मंत्री अशा विविध पद्धतीने भोगली आहेत. हिकमत उडाण उद्धव ठाकरे शिवसेना गटाकडून होते त्यामुळे त्यांना तिकीट मिळणे अवघड होते त्यामुळे त्यांनी महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीमध्ये आज प्रवेश केला आणि येणाऱ्या निवडणुकीमध्ये राजेश टोपे वर्सेस हिकमत उडाण अशी सरळ लढत होण्याचे चिन्ह आता समोर दिसत आहेत. या पक्षप्रवेश सोहळा वेळी माजी मंत्री अर्जुन खोतकर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते.

### अश्विन शुद्ध भागवत एकादशीनिमित्त पंढरपुरात हजारो भाविकांची मांदियाळी



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** अश्विन महिन्यातील भागवत शुद्ध एकादशीनिमित्त पंढरपुरात हजारो भाविकांनी विठ्ठल दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. सकाळपासून विठ्ठल मंदिर परिसर, चंद्रभागा नदी प्रदक्षिणामार्ग, महाद्वार, पश्रिचमद्वारसह दर्शन रांग ही भाविकांच्या गर्दीने गजबजुन गेली आहे. आज श्री विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनासाठी किमान सहा ते सात तासांचा कालावधी लागतो आहे तर मुखदर्शनासाठी एक ते दीड तासाचा कालावधी लागत आहे.

### ९५ लाख मालमत्ता कर न भरणाऱ्या पेट्रोल पंप मालकाचे कार्यालय सील केडीएमसीचा इशारा



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली महापालिकेने मालमत्ता कर थकवणाऱ्यांविरोधात कठोर पावलं उचलल्यास सुरुवात केली आहे. कल्याण पश्रिचमेकडील रोशन पेट्रोल पंप मालकाने मालमत्ता करापोटी केडीएमसीचे तब्बल ९५ लाख रुपये थकवले होते. अनेकदा नोटीसा पाठवून देखील त्यांनी थकीत रकमेचा भरणा केला नाही केडीएमसीला दाद दिली नाही .अखेर आज केडीएमसीच्या पथकाने रोशन पेट्रोल पंपचे कार्यालय सील केले पुढील आठ दिवसात जर त्याने थकीत रकमेचा भरणा केला नाही तर पेट्रोल पंप सील करण्यात येईल असा इशारा देखील केडीएमसी अधिकाऱ्यांनी यावेळी दिला .केडीएमसीच्या या धडक कारवाईमुळे मालमत्ता कर थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.

### टोल माफीचा सरकारचा निर्णय ऐतिहासिक आहे - खासदार श्रीकांत शिंदे



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :**मुंबईच्या टोलनाक्या हलक्या वाहनांना टोल माफी करण्यात आलीय. हा राज्य मंत्रिमंडळाचा हा ऐतिहासिक निर्णय असून या निर्णयामुळे मुंबई एम एम आर रिजन मधील ठाणे, पालघर अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर या शहरातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत अशी प्रतिक्रिया खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिली. खासदार श्रीकांत शिंदे हे अंबरनाथ मधील आयटीआयच्या नव्या इमारतीच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला आले होते, त्यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया दिलीय.

# मालेगांव येथे नवदुर्गा उत्सव निरोप मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगांव:** शहरासह तालुयात ३ ऑटोंबर रोजी नवरात्रोत्सवाची मंगलमय वातावरणात घरोघरी घटस्थापना करण्यात आली. आई जगदंबेच्या भक्तांनी नऊ दिवस मांगल्य पाविद्य जपत भक्तिमय वातावरणात उपासना करून दररोज मंडळा समोर भारुड, किर्तन, आईचा जोगवा आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले. दसर्याच्या दुसरे दिवशी १३ ऑटोबर रोजी शहरातील सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने नवदुर्गे ला भावपूर्ण निरोप दिला.

विसर्जन मिरवणूकिला सकाळी साडेअकरा वाजता पासून सुरुवात झाली. यामध्ये आई जगदंबा माईची भव्य मुर्ती सुशोभित सजविलेल्या वाहानावर आरूढ करून समोर ढोल ताशासह डिजे च्या वाद्याच्या गजरात फुलांची उधळण करीत मंगल वाद्याच्या गजरात आई भवानी ,जगदंबा, अंबाबाईच्या जयजयकारात मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. शहरातील रस्त्यावर सडा टाकून महिलांनी ठिकठिकाणी रांगोळीने रस्ते सजविले होते. ठिक– ठिकाणी विसर्जन मिरवणुकीत महिलांनी पंचआरतीने ओवाळून




मिरणरकितील सर्व नवदुर्गा मंडळाची पुजा–अर्चा करून पुष्पहार अर्पण करून आशिर्वाद घेतले.मिरणुकीची सुरवात गांधी चौक , मोठे मारुतीच्या मंदिर,दुर्गा चौक,महात्मा फुले चौक,माळी वेटाळ, खवले वेटाळ,मराठी शाळा ,शिव चौक येथे येऊन संपन्न होते. मिरवणूकी दरम्यान विविध समाजसेविनि जल पानाच भक्तगनान साठि नियोजन केले होते. या मध्ये माळी वेटाळ येथे आशीष बळी व मित्र मंडळाच्या वतीने मिरवनुकितल्या सर्व भक्तानां खिचड़ी चे वाटप केली होती. सार्वजनिक विसर्जन मिरवणुकीत शहरातील एकूण २० मंडळापैकी ११ मंडळांनी सहभाग घेतला. यामध्ये पहिल्या क्रमांकावर महात्मा फुले नवदुर्गा उत्सव मंडळ, जय भवानी नवदुर्गा उत्सव मंडळ, ढवळेश्र्वर नवदुर्गा, जनता नवदुर्गा उत्सव, कोथळेश्र्वर नवदुर्गा, योगेश्र्वर नवदुर्गा मंडळ, बालाजी नवदुर्गा, जय नवदुर्गा, शिवाशक्ती नवदुर्गा, माऊली नवदुर्गा मंडळांनी सहभाग नोंदविला. महात्मा फुले नवदुर्गा उत्सव मंडळाने विसर्जन मिरवणुकीत लेजिम, विविध धार्मिक वेशभुषेतून भूमिका साकारलेले देखावे सादर करुन प्रेक्षकांचे लक्ष वेधले. मिरवणुक दरम्यान ५७ अंमलदार आणि ११पोलिस अधिकारी,४० होमगार्ड, १ आरसीबी पथक सह ठानेदार संजय चौधरी यांचा मार्गदर्शना मध्ये पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता.

# पुन्हा चक्रीवादळ धडकणार, मुसळधार पाऊस

नवी दिल्ली : देशात मान्सूनने परतीचा प्रवास सुरू केला आहे. असं असूनही, भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) १६ ऑक्टोबरपर्यत १० राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. देशातील अनेक भागांत पुढील काही दिवसांमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, येत्या दोन दिवसांत नैऋत्य मोसमी पाऊस गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, महाराष्ट्राचा काही भाग, बिहार आणि झारखंडमधून म घारी जाण्याची शक्यता आहे. या दरम्यान अनेक राज्यांमध्ये विशेषत: दक्षिण द्वीपकल्पीय भारतामध्ये मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरात पुन्हा एकदा घडमोडींना वेग आला आहे. तिथे सोमवारपर्यत कमी दाबाच्या पट्ट्याचं चक्रीवादळात रूपांतर होणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेशच्या गृहमंर्त्यांनी गृह आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. सर्व यंत्रणांना संभाव्य परिणामांसाठी सज्ज राहण्याच्या सूचना मिळाल्या आहेत. बापटला, प्रकाशम, नेल्लोर, कुरनूल आणि नांद्याला सारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. या चक्रीवादळाचा बंगालपासून ते बिहारपर्यत परिणाम दिसेल.

आयएमडीच्या अंदाजानुसार, तामिळनाडू आणि पाँडीचेरीमध्ये १५ ऑक्टोबरपर्यत, केरळमध्ये पुढील सहा दिवसांत आणि आंध्र प्रदेशमध्ये १४ ते १६ ऑक्टोबरपर्यत मुसळधार पाऊस पडू शकतो. कर्नाटकातही १४ ऑक्टोबरपर्यत पाऊस पडेल. तामिळनाडू आणि केरळमध्ये १४ आणि १५ ऑक्टोबरला जोरदार पाऊस पडू शकतो.

तसेच आज (१४ ऑक्टोबर) गुजरातमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, मध्य प्रदेशचा पूर्व भाग, विदर्भ, छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिल्लीतील वातावरण अंशत: ढगाळ असेल आणि कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान १९ अंश सेल्सिअस असेल. राष्ट्रीय राजधानीसाठी हवामानाबाबत कोणताही विशेष अलर्ट नाही.

बिहारचं हवामान कसं असेल?

बिहारमधून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. हवामानखात्याच्या म्हणण्यानुसार, १८ ऑक्टोबरपर्यत काही ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस पडू शकतो. पण, चक्रीवादळाच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर सुपौल, अररिया, किशनगंज आणि भागलपूर सारख्या जिल्ह्यांमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील सहा दिवस राज्याच्या उत्तर आणि दक्षिण भागातील हवामान कोरडं राहील, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. रात्रीचं तापमान हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे. दिवसा तापमापकाचा पारा किंचित वाढू शकतो, त्यामुळे आर्द्रताही वाढेल. पश्चिमकडील वाऱ्यांच्या आगमनामुळे वातावरणात गारवा निर्माण होत आहे. दिवाळी व छठ सणाच्या आसपास थंडीला सुरुवात होऊ शकते.

### टीम इंडियासाठी खुशखबर, भिडावे लागणार नाही ऑस्ट्रेलियाच्या या दिग्गज खेळाडूशी, ६ महिन्यांसाठी गेला संघाबाहेर


नवी दिल्ली : बॉर्डर–गावस्कर करंडक स्पर्धे साठी टीम इंडियाचा ऑस्ट्रेलिया दौरा अद्याप सुरू झालेला नाही आणि चांगली बातमी मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू होण्यापूर्वीच यजमान संघाला मोठा धक्का बसला आहे. त्यांचा स्टार खेळाडू बाहेर गेल्यामुळे त्यांना हा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीनबाबत आता परिस्थिती स्पष्ट झाली आहे. तो यापुढे भारताविरुद्धच्या ५ कसोटी सामन्यांच्या मायदेशातील मालिकेत खेळणार नसल्याचे निश्चित झाले आहे. कारण ग्रीन जवळपास ६ महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर राहणार आहे.

कॅमेरून ग्रीन क्रिकेटपासून दूर का राहणार आहे? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे त्याच्या पाठीला झालेली दुखापत, ज्याच्या उपचारासाठी ऑस्ट्रेलियन अष्टपैलू खेळाडूवर शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. गेल्या महिन्यात इंग्लंड दौऱ्यात कॅमेरून ग्रीनला पाठीला दुखापत झाली होती. त्याच्या दुखापतीचे स्कॅनिंग केले असता, दुखापतीने प्रभावित भागात अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाल्याचे आढळून आले. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एक प्रसिद्धीपत्रक जारी करून ग्रीनच्या दुखापतीबाबत माहिती दिली. ऑस्ट्रेलियन अष्टपैलू खेळाडू ६ महिने क्रिकेटपासून दूर राहणार आहे, याचा अर्थ असा आहे की तो भारताविरुद्धच्या ५ कसोटी मालिकेतून बाहेर पडणार नाही. याशिवाय पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठीही तो श्रीलंका दौऱ्यातून बाहेर राहणार आहे.

# एम.डी. विक्री करणारे दोन पुरुष व एक महिला आरोपी जेरबंद ८,२२,५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशकात पुन्हा एकदा एमडी ड्रग्सच जाळ तयार व्हायला लागले. नाशिकच्या नाशिक रोड परिसरात दोन पुरुषासह एका महिलेला नाशिक पोलिसांच्या ड्रग विरोधी पथकाने अटक केली आहे. मुंबई येथून एमडी ड्रग्ज या अमली पदार्थाची तस्करी करत नाशकात आले होते. रविवारी नाशिकरोड परिसरात अमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली. संशयित कारमधून एमडीची तस्करी करण्याकरीता शहरात आले



होते. पथक त्यांच्या मागावर होते. संशयित फैजल शेख, शिबान शफी शेख व हिना शिबान शेख अशी या संशयितांची नावे असून त्यांच्याकडून कारसह ८ लाखाचे ९९ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत नाशिकरोड पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय.मुंबई येथून कारमधून एमडी तस्कर शहरात येणार असल्याची माहिती मिळाली. संशयित महामार्गावरून येणार असल्याची माहिती मिळाल्याने पाथर्डी फाटा येथील एका हॉटेलजवळ सापळा रचण्यात आला. मात्र पथकाला संशयित कार दिसून आली नाही. संशयित कार पाथर्डीमार्गे नाशिकरोडकडे जात असल्याचे समजले. पथकाने काही अंतरावर कारचा पाठलाग सुरू केला. कार बिटको चौकात उभी असताना पथकाने कारला घेराव घातला आणि कारमधील संशयितांना ताब्यात घेतले. कारमधील सीटखालील बॉक्समध्ये एमडी पावडर मिळून आली.

### मुंबईवरुन न्यूयॉर्कला जाणाऱ्या विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी, दिल्लीत इमर्जन्सी लँडींग

नवी दिल्ली : मुंबईवरुन न्यूयॉर्कला निघालेल्या विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याची धमकी देण्यात आल्यानं मोठी खळबळ उडाली. या विमानाला दिल्लीकडं वळवून दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं आहे. एअर इंडियाचं हे विमान मुंबईहून न्यूयॉर्कला जात असताना विमानात बॉम्ब ठेवल्याची माहिती मिळाल्यानंतर ते नवी दिल्लीच्या दिशेनं वळवण्यात आलं.

मुंबईवरुन न्यूयॉर्कला निघालं होतं विमान : दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एअर इंडियाचं हे विमान मुंबईहून न्यूयॉर्कला निघालं होतं. यावेळी विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याची माहिती विमानतळ प्राधिकरणाला देण्यात आली. त्यामुळे न्यूयॉर्कला जाणारं हे विमान दिल्लीकडं वळवण्यात आलं. हे विमान सध्या वळवून दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उभं आहे. विमानातील प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची खात्री करण्यासाठी सर्व सुरक्षा प्रोटोकॉलचं पालन केलं जात आहे.

लंडनहून दिल्लीला येणाऱ्या विमानात बॉम्ब : लंडनहून दिल्लीला येणाऱ्या बुधवार ९ ऑक्टोबरच्या विमानात बॉम्ब असल्याची माहिती विमानतळ प्राधिकरणाला देण्यात आली होती. त्यामुळे मोठी खळबळ उडाल्यानं दिल्लीतील आयजीआय विमानतळावर सुरक्षा वाढवण्यात आली. बुधवारी सकाळी ८.४५ च्या सुमारास घ्उघ विमानतळ प्राधिकरणाला एक कॉल आला, यामध्ये लंडनहून दिल्लीला येणाऱ्या विस्तारा विमानात बॉम्ब असल्याची माहिती देण्यात आली. फोन करणाऱ्यानं फ्लाइटच्या टॉयलेटमध्ये एक चिठ्ठी सापडली, यामध्ये 'या विमानावर बॉम्बफेक' असं लिहिलेलं होतं. मात्र, मिळालेल्या माहितीनंतर विमान तीन तास उडत राहिलं, त्यानंतर रात्री ११.४५ वाजता दिल्लीत उतरलं गेलं. १ सप्टेंबर २०२४ रोजी जबलपूरहून हैदराबादला जाणारं इंडिगो फ्लाइट ६ए ७३०८ बॉम्बच्या धमकीमुळे नागपूरला वळवण्यात आलं होतं. लँडिंग करुन सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आलं. यावेळी तपासणी करण्यात आली.

# येवल्यातील राडा हा स्थानिक विरोधकांकडून करण्यात आला; छगन भुजबळ यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** येवल्यात मराठा आंदोलक आणि मंत्री छगन भुजबळ यांच्या समर्थकांमध्ये रविवारी दि.१३ ऑक्टोबर रोजी जोरदार राडा झाला. मनोज जरांगे पाटील येवल्यात शिवसृष्टीला भेट देण्यासाठी आले असता त्यावेळी मराठा आंदोलक आणि भुजबळांचे समर्थक आमनेसामने आले.

भुजबळ समर्थनार्थ व मराठा आंदोलक यांच्यात जोरदार घोषणाबाजी झाली. येवला येथे झालेल्या यांच्याबाबत प्रतिक्रिया देताना राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी येवल्यातील रडा हा स्थानिक विरोधकांकडून करण्यात आला असा आरोप प्रसार माध्यमांशी बोलताना केला आहे.

यावेळी मंत्री छगन भुजबळ प्रसार माध्यमांश बोलताना म्हणाले की, मी काल दफणविधीच्या कार्यक्रमात होतो. शिव छत्रपतींच्या समोर अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणे अतिशय वेदनादायी आहे.जरांगे येणार होते, त्यांची येथे सभा



होती. त्यापूर्वी त्यांनी शिवाजी महाराज यांचे दर्शन घेतले. त्यांच्या बद्दल तक्रार नाही. त्यानंतर जरांगे यांच्या लोकांनी शिवीगाळ केली. तेव्हा आमच्या लोकांनी शिवीगाळ करताय हे योग्य नाही.इथं शिवीगाळ करू नका असे म्हटले.

यावेळी त्या लोकांनी दरवाजावर लाथा मारायल्या. महाराजांच्या वास्तूवर लाथा मारणे योग्य नाही.माझ्या फोटोचे बॅनर फाडून टाकले पण सोबत शिवाजी महाराजांचे चित्र होते हे त्यांच्या लक्षात आले नाही.काही लोक निवडणुकीसाठी इच्छूक आहेत म्हणून त्यांनी हा पराक्रम केला. शिवाजी महाराजांच्या प्रांगणात का असे केले माहिती नाही.पण जरांगे आले त्यांनी शांततेत दर्शन घेतले. जे झाले त्याला आता काही इलाज नाही, आपल्या पेक्षा पोलिसांना जास्त माहिती आहे.येवल्यातील व महाराष्ट्रातील जनता याचा विचार करेल. माझे कार्यकर्ते शिवीगाळ करणार नाहीत याचा मला विश्र्वास आहे, शिवकालीन शस्त्र यासाठी देखभाल आणि माहिती देण्यासाठी आमचे लोक तिथे स्वयंसेवक होते. झालेला राडा हा स्थानिक विरोधकांनी केला,असा आरोप अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केला.

## विविध वृत्त...

### बुलढाण्यात परतीच्या पावसाचा दणका; बुलढाण्यातील सागवनमध्ये घरात शिरले पाणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात परतीच्या पावसाने रात्री चांगलाच दणका दिला आहे. पाच तासाच्या पावसाने धुमाकूळ घातला. यात बुलढाणा शहरात नजीक असलेल्या सागवन येथे अनेक घरामध्ये पावसाचे पाणी घुसले आहे.गेल्या काही दिवसापासून बुलढाणा जिल्ह्यात परतीच्या पावसाचा जोर वाढला आहे. पावसामुळे काढणीला आलेल्या सोयाबीनच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून पावसामुळे सोयाबीनची काढणी ठप्प झाली आहे. रात्री पावसाने विजांच्या गडगडाटासह जोरदार हजेरी लावली. दरम्यान या पावसामुळे बुलढाणा शहरातून येत असलेल्या नाल्याचे पाणी सागवान परिसरातील घरामध्ये घुसल्याने घरातील अन्नधान्य व साहित्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.


### नळगंगा धरणाचे ११ दरवाजे उघडले; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील नळगंगा धरण १०० टक्के भरले आहे. तसेच या धरण प्रकल्पामधून सध्या १९५० क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे नळगंगा नदीकाठच्या गावासह शेतकऱ्यांना सावधानतेचा इशारा प्रशासनाने दिला आहे. अशी माहिती उपविभागीय अधिकारी एस. पी. पाटील यांनी दिली आहे. सतत कोसळत असणाऱ्या मुसळधार पावसामुळे धरणामध्ये पाणी येण्याचा ओघ सुरु आहे. यामुळे धरणात पाण्याचा प्रवाह सुरू असल्याने नळगंगा धरणाचे अगोदर ३ दरवाजे व नंतर ११ वक्र दरवाजे उघडले असून यामुळे पाणी मोठ्या प्रमाणात कालव्याद्वारे नळगंगा नदीतून सोडण्यात आले आहे. यामुळे मोताळा, मलकापूर तालुक्यातील नदीकाठच्या गावांसह शेतातील पिकांना फटका बसला आहे.

### भिवंडीत परतीच्या पावसाचा धुमाकूळ: अनेक घरांचे पत्रे उडाले





दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडीत परतीच्या पावसाने जोरदार थैमान घातले असून, विजेच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसाने तालुक्यातील ग्रामीण भागांत हाहाकार माजवला आहे. भिवंडी तालुक्यातील करंजोटी गावात या पावसामुळे अनेक घरांचे पत्रे उडाले असून, ग्रामीण भागातील विजेच्या तारा आणि खांबावर पावसाचा मोठा परिणाम झाला आहे. विजेच्या कडकडाटासह आलेल्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी बत्ती गुल झाली आहे. वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसानझालेआहे.

### रणबीर कपूरनं पुन्हा आणली वरात, सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता रणबीर कपूर प्रसिद्ध डिझायनर तरुण ताहिलियानीच्या शो 'बारात बाय तसवा'मध्ये सहभागी झाला होता. रणबीरनं वरातीसह मंचावर प्रवेश केलाय. शोमध्ये वराच्या लूकमुळे त्यानं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. रणबीरनं डिझायनरचे कलेक्शन पाहिल्यानंतर त्याला पत्नी आलिया भट्ट आणि त्याच्या लग्नाचा दिवस आठवला. रविवारी १३ ऑक्टोबर रोजी झालेल्या फॅशन शोमध्ये रणबीरनं ढोल-ताशे आणि लग्नाच्या मिरवणुकीसह स्टायलिश कारमध्ये स्फोटक एंट्री केल्यानंतर आता याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना दिसत आहेत.

# भू वैज्ञानिक सर्वेक्षण मंत्रालयाच्या टीमने घेतला स्वच्छता अभियानात भाग

## मी लोणारकर ग्रुप सोबत स्वच्छता अभियान

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण मंत्रालयाच्या उपसचिव दीपिका शर्मा व त्यांच्या सहकार्यांनी मी लोणारकर वन ग्रेट हवर या सोशल मीडियाच्या सदस्यांसोबत जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरातील स्वच्छता अभियानात सहभाग घेत स्वच्छता अभियान राबविले. लोणार येथे जगप्रसिद्ध सरोवर असून या सरोवराला पाहण्यासाठी संपूर्ण देशासह विदेशातून पर्यटक येतात. त्यांना इथे आल्यानंतर प्रसन्नता वाटावी येथील परिसर स्वच्छ व सुंदर राहावा, जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या सौंदर्यात भर



पडावी,यासाठी लोणार येथील मी लोणारकर वन ग्रेट हवर या सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वच्छता अभियान राबविल्या जाते आहे .लोणार येथील जगप्रसिद्ध सरोवर पाहण्यासाठी आलेल्या भारतीय वैज्ञानिक सर्वेक्षण खान मंत्रालयाच्या उपसचिव दीपिका शर्मा यांना या मी लोणारकर सोशल मीडियाच्या ग्रुप संदर्भात माहिती मिळाली. त्यांनी या सोशल मीडियाच्या सदस्यांसोबत संपर्क साधून त्यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता अभियानाची माहिती जाणून घेतली व या सोशल मीडियाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. तसेच येथील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल परिसरातील पाहणी केली. यावेळी त्यांना परिसर स्वच्छ व सुंदर दिसून आल्याने त्यांनी या ग्रुपच्या कार्याबद्दल कौतुक केले.

यावेळी मी लोणारकर वन ग्रेट हवर या ग्रुपचे सदस्य सचिन कापुरे यांनी त्यांना या उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी या वैज्ञानिक सर्वेक्षण खान मंत्रालयाच्या टीमने चित्रकला स्पर्धा राबवून नैसर्गिक संवर्धनाचा संदेश दिला. त्याचबरोबर चित्रकलेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार सुद्धा दिले. यावेळी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण निर्देशक डॉ. मनीष चव्हाण, विनोद पराठे मी लोणारकर ग्रुपचे सदस्य तसेच लोणार येथील वन विभागाचे कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

### लोणार सरोवर पाहण्याची व स्वच्छता अभियानात सहभागी होण्याची संधी मिळाली



मी हायस्कूल चे प्रांगणातील साफसफाई, सुत्रता, निर्मलता जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता मी लोणारकर ग्रुपच्या संदर्भात मला माहिती मिळाली. नंतर मी त्या ग्रुपच्या सदस्यांना भेटून त्या ग्रुपच्या स्वच्छता अभियानात सहभागी झाली. मला लोणार सरोवर पाण्याबरोबरच येथील स्वच्छता अभियानात सहभागी होण्याची संधी मिळाली त्यामुळे मी खूप आनंदी आहे. सर्वांनी परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा.


**-दीपिका शर्मा**
**उपसचिव**

# आमदार संजय गायकवाड छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर आ.संजय गायकवाड यांनी १४ फेब्रुवारीला पुन्हा रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक होत नवस फेडला होता.

आगामी काळात विधानसभेच्या निवडणुका होत आहे या निवडणुकीत ऊर्जा मिळावी व विजय व्हावे यासाठी पुन्हा १३ ऑक्टोबर



रोजी बुलढाणा मतदार



संघाचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक झाले आहेत.१८ पकड जातीच्या लोकांना सोबत घेऊन शाश्वत विकास करण्याचा प्रयत्न केला आई भवानीच्या कृपेने प्रचंड यश मला आले आहे. जिल्ह्यातील जातिवाद संपवला.

मानवता म्हणून एका मळेत सर्व दैवत उभे करण्याचा प्रयत्न केला. तोच आदर्श घेत आपणही बुलडाणा विधानसभा मतदार संघाच्या विकासाकरिता प्रयत्नशील राहील.त्यासाठीच मी छत्रपती शिवरायांचे आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे अशी प्रतिक्रिया आमदार संजय गायकवाड यांनी दिली आहे.

### खेळताना चिमुकला पाय घसरून तलावात पडला, त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या भावाचाही मृत्यू

**जळगाव/प्रतिनिधी :** तलावाजवळ खेळत असलेल्या चिमुकल्याचा पाय घसरून तो तलावात पडला. आपल्या लहानग्या भावाला वाचवण्यासाठी गेलेल्या भावाचे प्रयत्न तोकडे पडले अन् या घटनेत दोन्ही सख्ख्या भावांना आपला जीव गमवावा लागला.

जळगावमधील मुक्ताईनगर तालुक्यातील सालबर्डी येथील दोन सख्ख्या भावांचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दोन्ही भाऊ अल्पवयीन आहेत. या घटनेने परिसरावर शोककळा पसरली आहे.सालबर्डी येथे कृष्णा गोपाळ ढाके हे आपली पत्नी आणि दोन मुलांसह वास्तव्यास आहेत. कृष्णा ढाके हे रिक्षा चालक असून त्यांची पत्नी शेतमजूर आहे.


# रिसोड येथे महाविकास आघाडीच्यावतीने ट्रॅक्टर मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्याकरिता रिसोड येथे महाविकास आघाडीच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते ५०० ट्रॅक्टर सह शेकडोच्या संख्येने शेतकरी मोर्चा सहभागी झाले होते अमरदास बाबा संस्थानच्या भव्य प्रांगणातून मोर्चाला सुरुवात झाली होती.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्याकरिता १४ ऑक्टोबर रोजी रोजी महाविका आघाडीच्या वतीने आमदार



अमित झनक यांचे नेतृत्वात ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे सर्व विषय असल्यामुळे मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला ५०० ट्रॅक्टर सह शेकडोच्या संख्येने शेतकरी मोर्चामध्ये सहभागी झाले होते येथील अमरदास बाबा यात्रा मैदानापासून ट्रॅक्टर मोर्चाला सुरूवात होऊन अष्टभुजा देवी चौक, आसन गली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सिव्हिल लाईन मार्गे तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला या ठिकाणी भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी आमदार अमित झनक यांच्यासह इतर नेत्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या यानंतर महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,वाशीम जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या यादीत समावेश करावा, सोयाबीन हमी भाव द्यावा, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा, वीज समस्या दूर करावी, शेतकऱ्यांचे स्प्रिंकलर व ठिबकचे अनुदान जमा करावे, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली मोर्चात सुमारे ५०० ट्रॅक्टर व शेकडोच्या संख्येने शेतकरी व काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते ठाणेदार भूषण गावंडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# चार वर्षापासून शेतकरी रोहित्रा प्रतीक्षेत; रोहित बसविण्यास टाळाटाळ



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** चार वर्षांपूर्वी कोटेशन भरले असले तरी अजूनही शेतकऱ्याच्या शेतात रोहित्र बसविले नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे महावितरण कंपनीकडून रोहित्र देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे.

वीज वितरण कंपनी नेहमीच यांना त्या कारणाने चर्चेत असते कधी भार नियमन , वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा तर कधी कार्यालयाकडून रोहित्र वीज जोडणी करण्यास टाळाटाळ याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असून आर्थिक नुकसान होत आहे आधीच अस्मानी सह सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना वीज वितरण कंपनीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

रिसोड येथील शेतकरी जनार्दन सिताराम क्षीरसागर यांनी शेतामध्ये रोहित्राची मागणी केली असून मार्च २०२० मध्ये कोटेशन भरले आहे कोटेशन भरून जवळपास चार वर्षाचा कालावधी लोटला असला तरी अजूनही त्यांच्या शेतात रोहित्र बसविण्यात आले नाही त्यांनी आजपर्यंत वारंवार महावितरणाच्या रिसोड व वाशीम येथील कार्यालयात जाऊन या प्रकरणी पाठपुरावा केला आहे तब्बल चार वर्षाचा कालावधी उलटला असला तरी अजूनही त्यांच्या शेतात रोहित्र बसविण्यात आले नसल्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे या नुकसानीला जबाबदार कोण असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे.

महावितरणाची सर्व कामे ठेकेदारा मार्फत केल्या जातात सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे काही कामे राहिली आहेत पुढील महिन्यात पेंडिंग असलेली सर्व कामे निकाली काढण्यात येतील असे येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयातून सांगण्यात आले आहे.

# मतदार यादीत नाव असल्याची खात्री करा- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक लवकरच घोषित होईल. त्याअनुषंगाने मतदार यादीमध्ये आपले नाव समाविष्ठ आहे किंवा नाही यांची मतदारांनी खात्री करावी. ज्या मतदारांचे नाव मतदार यादीमध्ये नाव नोंदविले नाही, त्यांनी आपले संबधित मतदान केंद्रावर नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, तहसिल कार्यालय येथे संपर्क साधुन आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार मतदारांनी आपले नाव मतदार यादीमध्ये असल्याची खात्री करावी. मतदानाचे दिवशी मतदार यादीतील नावाबाबत संभ्रम व नाव नसल्याने मतदानापासून वंचित राहण्यासारखा तक्रारी मोठा प्रमाणात होतात. यासाठी मतदार यादी व मतदान केंद्राबाबत सर्व नागरीकांना माहिती होणे आवश्यक आहे. सदर निवडणुकांमध्ये मताधिकार बजावण्यासाठी ही महत्त्वाची संधी असून नाव नसलेल्या मतदारांनी आपले नाव नोंदणी करावी. नोंदणीसाठी ऑनलाईन Voter helpline app किंवा voters.eci.gov.in यावर देखील आपले नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट करु शकतात. तसेच आपले मतदार यादीतील नाव व आपले मतदान केंद्र जाणून घेण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी किंवा आपले संबंधित तहसिल कार्यालयास संपर्क साधू शकतात. नागरीकांना मतदार नोंदणीसंदर्भात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा संपर्क केंद्र टोल फ्रि क्रमांक १९५० कार्यान्वित करण्यात आलेला आहे.



नागरिकांचे जीवनमान उंचावण्याबरोबर लोकशाहीचा पाया अधिक मजबुत होण्यासाठी सर्व नागरिक, युवक-युवती व महिलांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे. याकरीता समाजातील सर्व स्तरामध्ये मागास वंचित घटक, दिव्यांगासह सर्वाचा समावेश मतदार यादीमध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता ज्या युवक-युवती, महिला यांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविले नाही, त्यांनी आपले संबधित मतदान केंद्रावर नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(इडज), संबंधित तहसिल कार्यालय यांचेशी संपर्क साधुन आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घ्यावे. तसेच सर्व मतदारांनी विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये सर्व सातही विधानसभा मतदार संघातील जास्तीत जास्त प्रमाणात विक्रमी मतांची नोंद करून मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.